ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 3.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## April Special Issue VI - 2022




ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Effect of Gender on Anxiety, Depression and Stress. | Prof. Bappa S. Jadhav | 1-6 |
| 2 | Employability Skill Gap Analysis - Perspectives of TPOs and Recruiting Organizations | Dr. Mahantesh M. Kuri | 7-13 |
| 3 | 89% students fail writing exam numbers in lakh. -An Empirical Study. | Dr. Subhash Tulshiram Shekar | 14-18 |
| 4 | The Hamming Distance and Study of Constructions of Reed-Muller Codes | Mr. Madan R.V | 19-24 |
| 5 | Representation of Postcolonial and Historical Fiction in GirishKarnad'sTughlaq | Dr. Raji Ramesh (Net,Ph.D) | 25-32 |
| 6 | Slum Redevelopment: A Retrospective Study | Dr. Gouri Desai<br>Ar. DattatrayAmbure | 33-41 |
| 7 | Role of Information Technology in Agriculture Development of Nanded District | Dr. Choudhari Govind Pandurang | 42-43 |
| 8 | Custodial Torture & The Remedies In India | Pradeep Kumar Dwivedi | 44-52 |
| 9 | लक्ष्मण गायकवाड यांच्या साहित्यातील परखडपणा | प्रा. नवनाथ ज्ञानोबा पवळे | 53-57 |
| 10 | संत ज्ञानेश्वरांची धर्मकल्पना | प्रा.डॉ.मंगल हांडे | 58-61 |
| 11 | स्त्रीवादी साहित्य चळवळीचे स्वरुप | डॉ.शिवचरण प्रभाकर गिरी | 62-66 |
| 12 | अनंत सामंत यांच्या कादंबरीचा परिचय आणि स्वरुप | निशांत बाळकृष्ण ठाकुर<br>प्रा.डॉ.शत्रुघ्न फड | 67-72 |
| 13 | उत्तम बावसकर यांच्या 'टंचाई' या कथासंग्रहातील ग्रामीण जीवन | अश्विनी सदाशिवराव मुळे | 73-77 |
| 14 | १९९० ते २०१० या काळातील नाटककारांचे सामाजिक धोरण | श्रेया संतोष पांचाळ<br>प्रा.डॉ.शत्रुघ्न फड | 78-81 |
| 15 | मुस्लिम गझलकरांचे मराठी साहित्याला योगदान | प्रा.डॉ.केतकी प्रमोद भोसले | 82-87 |
| 16 | जागतिक मानवी हक्क - "एक ऐतिहासिक अभ्यास" | प्रा.डॉ.जी.डी.रुपवते | 88-90 |
| 17 | अस्पृश्य उद्धारक महर्षि विठ्ठल रामजी शिंदे | डॉ. एन. जी. भद्रे | 91-94 |
| 18 | कायदा आणि सुव्यवस्थेतील जिल्हा प्रशासनाची भूमिका | डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे | 95-97 |
| 19 | गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील उच्च माध्यमिक स्तरावरील वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभ्यास | प्राचार्य डॉ.एस.टी.भूकन<br>तात्यासाहेब हरिभाऊ मेघारे | 98-104 |
| 20 | बाह्य पर्यावरण अंतर्गत पर्यावरण व राजकीय व्यवस्था | प्रा.डॉ.तांदळे सच्चिदानंद काशिनाथ | 105-109 |

# कायदा आणि सुव्यवस्थेतील जिल्हा प्रशासनाची भूमिका

**डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि.बीड

**प्रस्तावना :**

भारतात प्राचीन काळापासून प्रशासनाचा महत्त्वाचा घटक म्हणून जिल्हा अतित्वात आहे.जिल्हा हा स्थानिक प्रशासनाचा सोयीचा घटक आहे लोकाप्रशासनाची कार्य करणारा तो अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.सामान्य जनतेचा दैनंदिन व्यवहारात फक्त जिल्हा प्रशासनाशी संबंध येतो.कैंद्र आणि राज्यशासनाशी संबंध साधावयाचा असेल तर जिल्हा प्रशासनाद्वारेच संबंध साधावा लागतो.भावुगोलीकदृष्ट्या अत्यंत सोयीचा भाग म्हणजे जिल्हा होय.कैंद्र आणि राज्य शासनाच्या जनकल्याणाच्या योजना जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम जिल्हा प्रशासन करते.

जिल्हा प्रशासनाचे प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी हे कार्य करतात.जिल्हा प्रशासनाचे अनेक उद्देश आहेत.त्यानुळे जिल्हाधिकारी यांना अनेक प्रकारची कार्य करावी लागतात.या कार्यात लोकांची सुरक्षा,कायदा आणि सुव्यवस्था राखणे,महसूल व्यवस्था,कोषागार व्यवस्था,कृषी सिंचन व्यवस्था,सामान्य आणि गरजू जनतेसाठी स्वत धान्य वितरण व्यवस्था करणे,नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती उदभवल्यास त्या आपत्ती पासून जनतेचे संरक्षण करणे,निवडणुकांचे संचालन करणे,स्थानिक स्वशासन संस्थाचा कारभार पाहणे,न्याय दंडाधिकारी म्हणून कार्य करणे अशी अनेक प्रकारची जनकल्याण कार्य जिल्हा प्रशासनाचा प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात.

जिल्हा प्रशासन अनेक प्रकारची कार्य जरी करत असले आणि सगळीच कार्य महत्त्वाची जरी असली तरी जिल्यात शांतता राहवी लोकांना सुख समाधानाने जीवन जगता यावे यासाठी कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य जिल्हा प्रशासनाला करावे लागते म्हणून त्याचाच आढावा या लेखात घेतलेला आहे.

**संशोधन लेखाचे उद्देश :**

१) कायदा सुव्यवस्थेतील जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका अभ्यासाणे.

२) जिल्हा प्रशासनाची कायदा आणि सुव्यवस्थेच्या यंत्रणा अभ्यासाणे.

३) जिल्हा प्रशासनाच्या कायदा सुव्यवस्थेसाठीच्या उपाय योजना अभ्यासाणे.

कायदा आणि सुव्यवस्था राखाणे he जिल्हा प्रशासनाचे महत्त्वाचे कार्य आहे.जिल्ह्याचा प्रमुख जिल्हाधिकारी असल्याने या कार्याची संपूर्ण जबादारी जिल्हाधिकारी यांचीच असते.जिल्ह्यात कायदा

सुव्यवस्था असल्यास इतर कार्य सुरळीत होतील आणि कार्यातील अडचणी दूर होतील.राज्य शासनाचे हे महत्वाचे कार्य आहे.त्यामुळे या कार्याला लागणारी यंत्रणा राज्य शासनाकडून निर्माण करण्यात आलेली आहे.जिल्हा प्रशासनात कायदा सुव्यवस्था निर्माण करणारे प्रमुख घटक खालीलप्रमाणे आहेत.

**१.दंडाधिकारी :**

जिल्हाधिकारी हाच दंडाधिकारी म्हणून महत्वाची भूमिका पार पाडत आसतो.अधिकारपद परंपरेनुसार उपजिल्हाधिकारी – उपदंडाधिकारी,तहसीलदार – तालुका दंडाधिकारी म्हणून कार्य करतात.परंतु जिल्हाधिकारी हेच कार्यकारी दंडाधिकारी म्हणून कार्य करतात.प्रत्यक्षात अंमलबजावणीचे कार्य जिल्हाधिकारी यांच्याच मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली चालते.फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये जिल्हाधिकारी कायदा आणि सुव्यवस्थेत महत्वाची भूमिका पार पाडत असतो.

**२.न्यायव्यवस्था :**

जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्याततील दुसरा महत्वाचा घटक म्हणजे न्याव्यावास्था होय.जिल्यातील न्याव्यावस्थेत जिल्हा न्यायालय,सत्र न्यालाय,उपविभाग व तालुका पातळीवरील न्यायव्यवस्थेचा समावेश होतो.जिल्हा न्यायधीश हेच सत्र न्याय्धीस्घ म्हणून फौजदारी खटल्यचा न्याय निवडा करतात.जिल्हा न्याय्धीश फौजदारी व दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आधारे न्याय देण्याचे कार्य करतात.भारतीय दंड संहितेच्या आधारे गंभीर खात्ल्यासाम्बंधीचे निर्णय दिले जातात.सत्र न्यायाधीस जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडून आलेल्या अपिलांची देखील सुनावणी करतात.जिल्यात कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्यात न्यायव्यवस्थेची भूमिका महत्वाची आहे.

**३.पोलीस व्यवस्था :**

पोलीस व्यवस्था नसेल तर कायदा सुव्यवस्था राखणे अत्यंत कठीण आहे.जिल्ह्यातील पोलीस व्यवस्था जिल्हा पोलीस अधीक्षकापासून ते गावातील पोलीस पाटील व कोतवाल या पदापर्यंत कार्य करते.जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था राखण्यची जबाबदारी जिल्हा प्रशासनाचा प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी यांची आहे.पोलीस अधीक्षक ते पोलीस शिपाई हि सर्व यंत्रणा जिल्हा दंडाधिकारी या नात्याने जिल्हाधिकारी यांच्याच नियांत्रांखाली कार्य करते.जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर आदेश देण्याचे कार्य जिल्हाधिकारीच करत असतात.जिल्हाधिकारी यांचीच जिल्हात कायदा सुव्यवस्था राखण्यची जबाबदारी आहे.

**४.गुप्तवार्ता :**

जिल्हात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यातील अत्यंत महत्वाची बाब म्हणजे गुप्तवार्ता होय.गुप्तहेरामार्फत केले जाणारे कार्य हे जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यातील महत्वाचा घटक आहे.गुप्तवार्ता यंत्रणेकडे दुर्लक्ष करता येत नाही.हेर खात्याचे कार्य हा एक कायदा आणि

सुव्यवस्थेचाच भाग आहे.हा विभाग जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था निर्माण करण्यात जिल्ह्यधिकारी यांना मदत करत असतो.

**५.कारागृह प्रशासन :**

कारागृह प्रशासन हा जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यातील महत्वाचा घटक आहे.गुन्ह्याखाली अटक केलेल्या आरोपींना व आरोप सिद्ध झाल्यानंतर गुन्हेगारांना ठेवण्यासाठी केलेली व्यवस्था म्हणजे कारागृह प्रशासन होय.जिल्हा दंडाधिकारी या नात्याने कारागृह प्रशासन हे जिल्हाधिकारी यांच्या अधिकार कक्षेत येते.याशिवाय जिल्हातील इतर ठिकाणी कारागृहे असतात.जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राखण्यात जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणात असलेल्या कारागृह प्रशासनाची भूमिका महतवाची आहे.

**सारांश :**

जिल्हा प्रशासनाच प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी यांची भूमिका सर्वात महत्वाची आहे.जिल्ह्यातील जनतेच्या कल्याणाची कार्य करण्याबरोबरच इतरही अनेक कार्य जिल्हाधिकारी यांना करावी लागतात.यापैकी सर्वात महत्वाचे कार्य .म्हणजे जिल्ह्यात विकास कामाबरोबरच शांतता राहावी, जनकल्याणाची कार्य करता यावीत यासाठी कायदा व सुव्यवस्था निर्माण करणे,राखणे हे कार्य जिल्हा प्रशासनाचा प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी करतात. पोलीस अधीक्षक ते पोलीस शिपाई हि सर्व यंत्रणा जिल्हा दंडाधिकारी या नात्याने जिल्हाधिकारी यांच्याच नियांत्रांखाली कार्य करते.जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर आदेश देण्याचे कार्य जिल्हाधिकारीच करत असतात.

**संदर्भसूची :**

१.अर्जुन दर्शनकार,जिल्हा प्रशासन,विद्या बुक्स पब्लिकेशनऔरंगाबाद-१९९८

२.डॉ.बी.एल.फाडिया,उच्चतर लोकप्रशासन,आगरा प्रकाशन,आगरा-२००४

३.डॉ.सुर्यकांत गडकरी,महाराष्ट्र राज्याची संघटना,अनमोल प्रकाशन पुणे-२००२

४.प्रा.के.आर.बंग,महाराष्ट्र प्रशासन, विद्या बुक्स पब्लिकेशनऔरंगाबाद-२००५

५.सुरेंद्र कटारिया,राज्य प्रशासन,जयपूर प्रकाशन जयपूर-२००५

◆◆◆